दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३४९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.३० जुलै २०२५


**आजचा सुविचार**

दु:खी माणसाला मदत करण्यासाठी
लांबवलेला एक हात,
प्रार्थने साठी जोडलेल्या...
दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त आहे.

## नागपूर व महाराष्ट्राची कन्या बुद्धिबळपटू दिव्या देशमुखचा सार्थ अभिमान - मुख्यमंत्री फडणवीस

### राज्य शासनातर्फे करण्यात येणार सन्मान...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, नागपूर :** नागपूर व महाराष्ट्राची कन्या बुद्धिबळपटू दिव्या देशमुख यांनी किशोरवयातच जागतिक बुद्धिबळस्पर्धेत विजेतेपद पटकावले असून 'ग्रँड मास्टर' हा किताब मिळविला आहे, त्यांची ही कामगिरी अभिमानास्पद असल्याचे सांगून राज्य शासनाच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

रामगिरी शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. दिव्या देशमुख यांनी भारतीय बुद्धिबळपटू कोनेरू हम्पी यांना जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पराभूत करून ही महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. कोनेरू हम्पी यांचे अभिनंदन करत दिव्या देशमुख यांनी दुसऱ्यांदा या स्पर्धेत सहभाग घेत यशोशिखर गाठल्याचे त्यांनी सांगितले. दिव्या देशमुख यांनी वयाच्या १९ व्या वर्षी ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी आतापर्यंत विविध स्पर्धेत २३ सुवर्ण पदकांसह जवळपास ३५ पदके पटकावली आहेत.

दिव्या देशमुख यांच्या या कामगिरीचा राज्य शासनाच्या वतीने सन्मान करण्यात येईल. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी चर्चा करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## कायदा क्षेत्रात मोठी झेप !

### कळव्यात उभारली जाणार अत्याधुनिक ॲडव्होकेट अकॅडमी



**अक्षराज : विनोद वास्कर**


**दि.२९, ठाणे :** महाराष्ट्र व गोवा वकील परिषद, मुंबई यांना ठाणे जिल्ह्यातील कळवा येथे ॲडव्होकेट अकॅडमी स्थापनेसाठी जमीन देण्यास महसूल विभागाने मान्यता दिली आहे.

या अकॅडमीच्या स्थापनेमुळे वकिलांना अत्याधुनिक प्रशिक्षण, बार परीक्षेसाठी तयारी, प्रॅक्टिकल सेशन्स, मूट कोर्ट, तसेच डिजिटल लॉ व सायबर लॉ सारख्या नवीन क्षेत्रांमध्ये कौशल्य विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

या संदर्भात ॲडव्होकेट रोहिदास मुंडे यांनी सांगितले की, ही अकॅडमी कायदा विद्यार्थ्यांसाठी व वकिलांसाठी सुवर्णसंधी ठरणार असून न्यायव्यवस्थेच्या बळकटीसाठी मोठा टप्पा आहे.

कळवा परिसरात रोजगाराच्या संधी निर्माण होतील, तसेचह स्थानिक व्यवसायालाही चालना मिळेल. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयामुळे राज्यात कायदा शिक्षण व न्यायव्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.

## ८ व्या एशियन तायक्वानडो जुनिअर स्पर्धेसाठी मुंबईच्या ७ खेळाडुंची भारतीय संघात निवड



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२९, मुंबई :** इंडिया तायक्वानडो संघटनेच्या वतीने महाराष्ट्र ओलम्पिक संघटनेचे महासचिव तथा इंडिया तायक्वानडो अध्यक्ष नामदेव शिरगांवकर यांच्या भारतीय संघातुन मुंबईचे ७ खेळाडू, ८ व्या एशियन जुनिअर तायक्वानडो स्पर्धेत कुचिंग, मलेशिया येथे २८ व २९ जुलै २०२५ रोजी भारतीय संघांचे प्रतिनिधित्व करत आहेत. ही स्पर्धा कॅडेट, जुनिअर व पारा(अपंग) खेळाडूंसाठी एशियन संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेत मुंबई संघाचे ७ खेळाडू भारतीय संघांचे नेतृत्व करीत आहेत. मुंबई संघटनेचे अध्यक्ष तथा दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते भास्कर करकेरा यांनी सांगितले.

आशिया खंडातील खेळाडूंमध्ये ही स्पर्धा रंगणार असून विविध देशभरातील खेळाडू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत.

**जुनिअर एशियन स्पर्धेत निवड झालेले खेळाडू खालील प्रमाणे.**

१) ध्रुव तंबाके २) उर्वी चव्हाण ३) शार्दूल शेंद्रे ४) अथर्व सावंत ५) रिया बनिया ६) मंजिरी तळगांवकर ७) गौरव नागवेकर

त्यांच्या या यशाबद्दल मुंबई जिल्हा संघटनेचे अध्यक्ष तथा दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते भास्कर करकेरा, सचिव - विल्सन वरळीकर, आंतरराष्ट्रीय पंच उषा शिर्के,-धामणसकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू राजेश खिल्लारे, शिव छत्रपती पुरस्कार विजेते - किशोर सिंग, जिल्हा पुरस्कार विजेते - सिद्धेश घाग, राहूल वाघमारे, सहाय्यक - विरेंद्र गायकवाड, सुनिल साखरकर आणि पालक वर्ग तसेच तायक्वानडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (कल्याण) संघटनेचे अध्यक्ष संदिप ओंबासे, महासचिव गफार पठाण, यांच्या वतीने अभिनंदनात्मक शुभेच्छाचा वर्षाव करण्यात येत आहे. या संपूर्ण संघास संघ प्रशिक्षक सिद्धेश घाग यांचे सहकार्य लाभले.

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मिडिया वापराबाबत महत्वाचा निर्णय

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२९, मुंबई :**

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडियाचा वापर करण्याबाबत नवे मार्गदर्शक नियम जाहीर केले असून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

डिजीटल युगात सोशल मीडिया हे संवादाचे प्रभावी साधन असले तरी त्यातून गोपनीय माहितीचा प्रसार, खोटी माहिती पसरवणे, तसेच शासकीय नियमांचे उल्लंघन होवू नये याकरिता मार्गदर्शक तत्त्वे आखण्यात आली आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ हे सोशल मीडियाच्या वापराबाबतही लागू राहतील. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना :-**

* राज्य शासनातील अधिकारी-कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम तसेच प्रतिनियुक्तीने किंवा करारपद्धतीने नेमलेले कर्मचारी यांना हे नियम लागू राहणार आहेत.
* शासनाच्या किंवा भारतातील कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलिकडच्या धोरणावर प्रतिकूल टीका करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडियाचा वापर जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने करावा.
* वैयक्तिक आणि कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट स्वतंत्र ठेवावेत. केंद्र किंवा राज्य शासनाने बंदी घातलेल्या वेबसाईट किंवा ॲपचा वापर करू नये.
* शासकीय योजना व उपक्रमांच्या प्रसारासाठी केवळ अधिकृत आणि प्राधिकृत माध्यमांचा वापर करावा. कार्यालयीन कामकाजाच्या समन्वयासाठी व्हॉट्सॲप, टेलिग्रामसारख्या मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर करता येईल.




* शासकीय योजनांच्या यशस्वितेसंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करता येईल; मात्र त्यातून स्वयंप्रशंसा होणार नाही याची दक्षता घ्यावी. वैयक्तिक अकाऊंटवर शासकीय पदनाम, लोगो, गणवेश, शासकीय मालमत्तेचे फोटो किंवा व्हिडिओ अपलोड करू नयेत. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, भेदभाव करणारा मजकूर पोस्ट किंवा फॉरवर्ड करणे मनाई आहे. प्राधिकृत मंजुरीशिवाय कोणतेही गोपनीय दस्तऐवज सोशल मीडियावर अपलोड करू नयेत.
* बदली झाल्यानंतर कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट योग्य प्रकारे हस्तांतरित करावे. शासनाने स्पष्ट केले आहे की, या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई केली जाईल. डिजिटल युगात सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर व्हावा आणि शासकीय यंत्रणेचा विश्वासार्हता अबाधित राहावी, यासाठी नियमावली करण्यात आली आहेत.

## पुण्यातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तिन्ही राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण करावे

### * उपमुख्यमंत्री पवार यांची मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, मुंबई :** पुणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी या भागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड), राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत), तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८डी (तळेगाव–चाकण–शिक्रापूर) या तिन्ही प्रमुख राष्ट्रीय महामार्गाचे तातडीने रुंदीकरण करावे, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्राद्वारे केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, पुणे महानगर आणि औद्योगिक परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता पुणे परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड) – सध्या चार लेन असलेला हा रस्ता सहा लेनमध्ये रुपांतर करावा, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत) – विद्यमान चार लेन रस्त्याचे सहा लेनमध्ये रूपांतर करावा, तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८डी (तळेगाव–चाकण–शिक्रापूर) – सध्या दोन लेन असलेला मार्ग सहा लेन करण्याची आवश्यकता आहे. या तिन्ही मार्गांवर शिक्षण संस्था, औद्योगिक पट्टा, वसाहती, रुग्णालये, पेट्रोलियम आणि वाहन उद्योग





तसेच व्यापारी हब असल्यामुळे वाहतुकीचा ताण प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे. रस्त्यांवर सतत वाहतूक कोंडीचा सामना



करावा लागत असून वाहनचालकांच्या सुरक्षेवरही प्रश्न निर्माण झाले आहेत. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी पत्रात पुढे म्हटले आहे की, या मार्गांवरील प्रवास करणाऱ्या वाहनांच्या संख्येची कमाल मर्यादा ओलांडली आहे. अशा परिस्थितीत या महामार्गावर तत्काळ लेन वाढवण्याचे काम करण्यात यावे, जेणेकरून येत्या काळात उभारल्या जाणाऱ्या एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामासाठीही पर्यायी मार्ग उपलब्ध होऊ शकेल.

हे तिन्ही महामार्ग पुणे शहराच्या प्रवेशद्वारांशी जोडले गेलेले असल्यामुळे, बाह्य भागातील मोठ्या प्रमाणावर वाहने शहरात प्रवेश करताना मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. यामुळे या मार्गांवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच, तळेगाव–चाकण–शिक्रापूर मार्गावरील रुंदीकरणाच्या कामास सध्या चालू असलेल्या एलिव्हेटेड हायवे निविदेच्या अंतिम टप्प्यापर्यंत तात्पुरता पर्याय म्हणूनही उपयोग होईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रस्तावास मान्यता देऊन आवश्यक निधी आणि प्रशासकीय मंजुरी तातडीने मिळवून देण्याची विनंती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे, जेणेकरून पुणे औद्योगिक परिसरातील वाहतूक समस्या दूर होण्यास मदत होईल.

## जि.प. शाळांच्या इमारतींचे पायाभूत अंकेक्षण करण्याची शिक्षक परिषदेची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९ चंद्रपूर :** राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे इमारतींचे दरवर्षी तज्ञ अभियंता कडून पायाभूत अंकेक्षण करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांनी शालेय शिक्षण मंत्री व शालेय शिक्षण राज्यमंत्री यांना नुकतीच पाठविलेल्या एका निवेदनाद्वारे केली आहे.

विद्यार्थ्यांचे सुरक्षितता दृष्टीकोनातून ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इमारतीची सुरक्षितता आणि स्थिरता तपासण्यासाठी पायाभूत अंकेक्षण महत्त्वाचे झाले आहे. या निमित्ताने शाळेत उपलब्ध इमारतींच्या बांधकामाची,

> नविन शालेय इमारतींचे बांधकाम वेळेवर पूर्ण होत नसल्याने वर्ग खोल्यांची कमतरता शाळांना भासते. त्यामुळे निर्धारित कालावधीत बांधकाम पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची मागणी सुद्धा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ने केली आहे.
>
> **- प्रकाश चुनारकर**
> **राज्य कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग)**

स्थितीची आणि आवश्यक दुरुस्तीची तपासणी होईल. इमारतींमध्ये काही धोकादायक दोष किंवा कमकुवतपणा या निमित्ताने पुढे येईल. पायाभूत अंकेक्षणात इमारतीची पायाभरणी, छत, भिंती याशिवाय इतर भागांची तपासणी करणे अत्यावश्यक झाले आहे. राज्यातील शालेय इमारतींची स्थिती, अग्नि सुरक्षा व वीज पाळ्यांची स्थिती यामुळे समोर येईल असे परिषदेने म्हटले आहे. तज्ञ अभियंता यांचेकडून पायाभूत अंकेक्षण झाल्यानंतर त्यांच्या स्वाक्षरी सह अंकेक्षण प्रत शाळा, पंचायत समिती, जिल्हा परिषद, शासन यांचेकडे पाठविण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ने शासनाकडे केली आहे.

**राज्यातील पावसाचा जोर बघता ज्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे परिसरात निर्लेखित इमारती उभ्या आहेत. त्यांची तात्काळ विल्हेवाट लावणे अत्यावश्यक झाले आहे. अशा उभ्या इमारतींमुळे धोकादायक परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्याचप्रमाणे शाळेच्या मुख्याध्यापकांकडून इमारती विषयी माहिती न मागता प्रत्यक्ष तज्ञ अभियंता यांनी दरवर्षी पायाभूत अंकेक्षण करून शालेय इमारतींची अद्ययावत माहिती शिक्षण विभागाला देणे अत्यावश्यक आहे.**

## संपादकीय



### वृक्षारोपणाची लोकचळवळ

मराठवाडा हा कमी पावसाचा प्रदेश. त्यात धाराशिव जिल्ह्याचे पर्जन्यमानही कमीच. जिल्ह्यात वनसंपदाही म्हणावी तेवढी नाही. सरकारी मोहिमा, संस्था, संघटना यांच्या पुढाकाराने गेल्या काही वर्षांत जिल्ह्यात अनेक ठिकाणी वृक्षारोपण मोहीम राबविली गेली; पण त्याचे प्रमाण कमीच म्हणावे लागेल.

जिल्हाधिकारी कीर्तीकरण पुजार व जिल्हा प्रशासनाच्या चमूने यंदाच्या पावसाळ्यात काही तरी वेगळे राबविण्याचा निर्णय घेतला. मार्च महिन्यात बैठकांचे सत्र सुरू झाले. त्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व तालुके, ग्रामपंचायतींचा आढावा घेतला गेला. जिल्ह्यातील सक्रिय ग्रामपंचायतींची वेगळी यादी काढली. ग्रामसेवक, सरपंचांच्या स्वतंत्र बैठका घेऊन त्यांना वृक्षारोपण मोहिमेची माहिती देऊन त्याचे महत्त्व समजावून सांगितले. जिथे हमखास जलस्रोत आहेत, अशा ठिकाणांचे स्वतंत्र वर्गीकरण केले. जमीन तपासणी, माती तपासणी करून घेतली. वृक्षारोपणाच्या जागा तयार करण्यात आल्या. घनवन पद्धतीने एक गुंठा जमिनीत किती झाडे लावायची याची आखणी केली गेली.

एरवी सरकारी मोहिमेचे नियोजन कशी कसे होते, त्याची अंमलबजावणी, आकडेमोड कशी केली जाते आपल्याला माहिती आहे. या मोहिमेसाठी मात्र सूक्ष्म पद्धतीने नियोजन केले गेले. एप्रिलपासून वृक्षारोपणाची ठिकाणे ठरविली त्या परिसरात बैठका घेण्यात आल्या. मोहिमेत सहभागी होणारे अधिकारी, कर्मचारी, गावकरी, स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन मोहीम कशी राबवायची याचे प्रशिक्षण दिले गेले. नुसती झाडे लावून उपयोग नाही, तर त्याचे संगोपन करणे तितकेच महत्त्वाचे आहे, हे जाणून वन विभागाने केलेल्या मदतीला जिल्ह्यातील नागरिकांनी जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत झाडांची काळजी घेण्याचे आश्वासन दिले. पावसाळ्यात धाराशिव जिल्ह्यात ५० लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित केले. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व लोकसहभागातून 'हरित धाराशिव' अभियान ठरविले गेले. १९ जुलै रोजी एकाच दिवशी १५ लाख झाडे लावण्यात आली. त्यात जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा, भूम, परंडा, वाशी व कळंब या आठ तालुक्यांतील २९४ ठिकाणी (२३४ ग्रामपंचायती, १३ नगरपालिका, नगरपंचायत, सीना कोळेगाव धरण आणि वन विभागाच्या ४५ आरक्षित वृक्षलागवड स्थळे) घन वन लागवड केली गेली.

या मोहिमेला तंत्रज्ञानाची जोड देताना एक पोर्टल तयार केले. प्रत्येक झाडाचा 'क्यू आर' कोड केला. मोहिमेपूर्वी सर्व झाडांना हे कोड लावण्यात आले. वृक्षारोपण मोहिमेची माहिती पोर्टलवर उपलब्ध करून दिली गेली. ज्यामुळे ठरावीक काळात जिल्हाभरात एकाच वेळी किती झाडे लावली, त्याची माहिती अद्ययावत होत होती. एकाच वेळी १५ लाख झाडे लावण्याचा विक्रम जागतिक पातळीवर नोंदवला गेला. मोहिमेसाठी नागरिक, ग्रामपंचायत, नगरपालिका पातळीवर पैसे खर्च करण्यात आले. सरकारच्या तिजोरीतून मदत मागितली गेली नाही. हा उपक्रम केवळ एक दिवसाचा नव्हे तर पर्यावरणीय पुनरुज्जीवनाचा ऐतिहासिक टप्पा म्हटले तर वावगे ठरू नये.

'हरित धाराशिव' अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या वनआच्छादनात लक्षणीय वाढ, नवीन शाश्वत पर्यावरणीय अधिवास निर्मिती, प्रत्येक गावात देवराई स्वरूपातील जैवविविधतेचे संवर्धन साधण्यास मदत मिळणार आहे. आता ही झाडे कशी टिकवली जातात हे पहावे लागेल. एकाच दिवशी १५ लाख वृक्षलागवड मोहिमेची दखल मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यांनीही घेतली आहे. बीड जिल्ह्यात लवकरच ही मोहीम हाती घेतली जाणार आहे. त्यासाठी धाराशिवकर मदतीला असणार आहेत. मराठवाड्यातील उर्वरित जिल्ह्यांत राज्यातही अशा प्रकारचा उपक्रम राबविला गेला, तर निश्चितपणे राज्याचा पर्यावरण समतोल राखण्यास मदत मिळेल. धाराशिवकरांची ही मोहीम अभिनंदनीय व अनुकरणीय आहे.

# ६४ घरांची मराठमोळी राणी

जॉर्जिया देशाची राजधानी असलेल्या बटूमी या शहरात पार पडलेल्या जागतिक महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत मराठमोळ्या दिव्या देशमुखने भारताच्याच कोनेरू हंपी हिला टायब्रेकरमध्ये २.५ – १.५ अशी आघाडी घेऊन विश्वविजेतेपद मिळवले आणि इतिहास घडवला. अवघ्या १९ वर्षाच्या दिव्याची ही कामगिरी स्वप्नवत अशीच आहे. तिच्या या कामगिरीने १३ कोटी मराठी माणसांचीच नाही तर १४५ कोटी भारतीयांची मान देखील अभिमानाने उंचावली आहे. हे विश्वविजेतेपद मिळवून दिव्याने आपणच ६४ घरांची नवी राणी असल्याचे सिद्ध केले. तिच्या कामगिरीचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे कारण ही स्पर्धा जेंव्हा सुरू झाली तेंव्हा तिला कोणीही जमेस धरले नव्हते. तिच्यापेक्षाही दिग्गज आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत जगभरातील १०७ बुद्धिबळपटू निवडले गेले होते. बाद फेरीने रंगलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीसाठी निवडलेल्या बुद्धिबळपटूत अव्वल तीन खेळाडू हे चीनचे होते. चौथी खेळाडू ही भारताचीच अंतिम फेरीत पोहचलेली कोनेरू हंपी होती. दिव्याचे स्थान पंधरावे होते. अंतिम फेरीसाठी आठ भारतीय आणि आठ चिनी खेळाडूंची निवड झाली होती. रशियाचेही काही खेळाडू अंतिम फेरीत होते. चीन, रशिया या देशातील खेळाडूंचा या स्पर्धेत दबदबा होता. भारताच्याही कोनेरू हंपी हिला विश्वविजेतेपदासाठी प्रबळ दावेदार समजले जात होते पण नवख्या दिव्याला मात्र कोणीच या स्पर्धेचे संभाव्य विजेते म्हणून संबोधले नव्हते मात्र जशीजशी स्पर्धा पुढे सरकत गेली तशीतशी दिव्याची कामगिरी सरस ठरत गेली. आपल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंवर मात करत दिव्या पुढे जात होती. अंतिम फेरी चीनच्या दोन खेळाडूत होईल अशी स्पर्धेच्या सुरवातीस जी शक्यता वर्तवण्यात आली होती ती फोल ठरवत दिव्या आणि कोनेरू यांनी सर्वांना चकित करून अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत दोन भारतीय खेळाडू असल्याने हा विश्वचषक भारताकडेच राहील हे स्पष्ट झाले. अंतिम फेरीत दिव्याची गाठ अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हंपी हिच्याशी पडली. ३८ वर्षीय ग्रँडमास्टर कोनेरू हंपी ही भारताचीच नव्हे तर जगातील दिग्गज बुद्धिबळपटू आहे. तिने याआधी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. अंतिम फेरीपूर्वी कोनेरूच सर्वाची हॉट फेवरेट होती कारण १९ वर्षाची दिव्या



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

तिच्यापुढे अतिशय नवखी होती. कोनेरूने २००२ साली जागतिक जलद बुद्धिबळ स्पर्धा जिंकली होती. त्यानंतर तीन वर्षांनी दिव्याचा जन्म झाला



होता. कोनेरूकडे अनुभव होता तर दिव्याकडे आत्मविश्वास होता. उपांत्य फेरीत दोघींनी चीनच्या खेळाडूंवर मात केली होती. अंतिम फेरीच्या सुरुवातीचे दोन्ही डाव बरोबरीत सुटले. टायब्रेकरच्या दुसऱ्या डावात दिव्याने वर्चस्व राखले. तिने हा डाव ७५ चालित जिंकला आणि विश्वविजेतेपदावर मोहोर उमटवली. अंतिम फेरीत अनुभवावर आत्मविश्वासाने मात केली आणि दिव्या बुद्धिबळाची नवी राणी ठरली. हा विश्वकप जिंकणारी दिव्या ही भारताची चौथी खेळाडू ठरली. याआधी हा किताब कोनेरू हंपी, रमेशबाबू वैशाली आणि द्रोणवली हरिका यांनी जिंकला होता. या विजेतेपदाबरोबर दिव्या आता ग्रँडमास्टरही बनली आहे. ग्रँडमास्टर ठरणारी ती भारताची चौथी खेळाडू ठरली आहे.

अर्थात दिव्याला मिळालेले हे यश एका रात्रीत मिळालेली नाही त्यासाठी तिला मोठा त्याग आणि परिश्रम करावे लागले आहे. ज्या वयात मुले टीव्हीवर कार्टून पाहण्यात व्यग्र असतात त्या वयात तिने बुद्धिबळ खेळण्यास सुरुवात केली. बुद्धिबळासाठी ती टीव्ही आणि मोबाईलपासून दूर राहिली. दिव्याने बुद्धिबळावर लक्ष केंद्रित करावे म्हणून तिच्या पालकांनी घरातील टीव्ही बंद केला. बुद्धिबळात आवड निर्माण झाल्यावर दिव्याने अवघ्या पाचव्या वर्षी पहिले विजेतेपद मिळवले. पाचव्या वर्षी बुद्धिबळात पहिले विजेतेपद मिळवणाऱ्या दिव्याने पुढे आपल्या विजेतेपदाचा धडाका सुरू केला. दिव्याने २००२ साली महिला बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आणि त्यानंतर पुढील वर्षी आशियाई स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. दिव्या अंडर २० विश्वचषक स्पर्धेची ज्युनियर चॅम्पियन देखील ठरली आहे. तिचा हा प्रवास निश्चितच प्रेरणादाई आहे. तिचे हे विजेतेपद देशातील किशोरवयीन मुलांसाठी प्रेरणादाई आहे. तिच्यामुळे आता ही मुले देखील बुद्धिबळाकडे वळतील आणि भविष्यात भारताला आणखी दिव्या मिळतील यात शंका नाही.

जागतिक विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धा जिंकून ६४ घरांची नवी राणी बनलेल्या मराठमोळ्या दिव्या देशमुख हिचे

**विश्वविजेतेपदासाठी मनापासून अभिनंदन!!!**

## पतीने मैत्रिण आणि आई-भावाच्या मदतीने विवाहितेला जाळलं !

**दि.२८, लातूर :** राज्यामध्ये वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर अनेक विवाहितांना सासरी छळ झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. आतापर्यंत अनेक विवाहित महिलांनी सासरच्या छळाला कंटाळून आयुष्य संपवलं, तर अनेक विवाहितांचा त्यांच्या सासरी मारण्याचा प्रयत्न झाला. अशीच एक घटना लातूर जिल्ह्यातील पानगाव येथे घडली आहे. विवाहित पत्नीने नवऱ्याला तू माझ्या मैत्रिणीला फिरायला का घेऊन गेलास असा जाब विचारला. त्यानंतर सासरच्या मंडळींनी मिळून महिलेच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला जीवंत जाळल्याची घटना समोर आली आहे. माझ्या मैत्रिणीला तू का फिरायला घेऊन गेलास? असं पत्नीने विचारतात पतीने आणि मैत्रिणीने मिळून विवाहित महिलेच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला पेटवून दिल्याची घटना समोर आली आहे. यात महिला ७० टक्के भाजली असून आता ती मृत्यूच्या दारात उभी आहे. पती आणि मैत्रिणीने आधी विवाहितेला जाळलं, नंतर सासू आणि दीर अशा चौघांनी संगनमताने तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना लातूर जिल्ह्यातील पानगाव येथे घडली आहे.

## कुभांड..

ट्रॅप मध्ये अडकलो
कुणी रचलं कुभांड
आकांडतांडव करा
जसे फुटे तसे भांड

बोभाटा करा जोरा
कुणीतरी करे कांड
सगळं शिजवूआणे
हवाय पंडीतप्रकांड

राजकारणी टिकायं
बनावे लागतेयं वांड
शक्कल अक्कल रे
आडवे हो आडदांड

आरोपांना भिऊनये
व्हायचे अगदी सांड
धावत्याघोड्यावरती
पक्की ठेवावी मांड

गरज लागते कधीही
आप्तांशी खोटे भांड
भाषण करा मुद्देसूद
पटव सारे हे थोतांड

व्यसन नसे आम्हांस
न लगे सुपारीचेखांड
मिडीया माझे बाजूने
शांतबसतील कुदांड

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## दुःखाचे क्षण आणि आनंदाचा गोडवा

मानवी जीवन म्हणजे दुःखाचे क्षण आणि आनंदाचे क्षण यांचे गाठोडे असते.ज्यांनी सुख आणि दुःख दोन्ही अनुभवलेले असते त्यांच्या जाणीवा प्रगल्भ झालेल्या असतात.त्यांचे वागणे बोलणे समतोल असते.ज्यांच्या जीवनात सुरुवातीला दुःखाचे क्षण आलेले असतात,ज्यांनी अतिशय वाईट दिवस भोगलेले असतात त्यांच्या जीवनात नंतर येणारे सुखाचे क्षण आनंद देऊन जातात.आणि ज्यांच्या जीवनात प्रथम सुखाचा झरा वाहत होता,जे सुखाच्या गादीवर लोळत होते त्यांच्या जीवनात नंतर दुःख आले की ते हातपाय गाळून बसतात.जीवन जगणं सोडून देतात.असे कदापि होता कामा नये.जीवनात दुःख आहे म्हणून सुखाचे महत्त्व कळते आणि सुख आहे म्हणून दुःखाचे गांभीर्य लक्षात येते.

आपल्या संतांचे व महामानवांचे जीवन अगोदर दुःखाच्या क्षणांनी व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीने गांजलेले होते.त्यांनी हिंमतीने जीवनलढा लढला,आपले सामाजिक कार्य अगदी प्रामाणिकपणे केले आणि सर्व सामान्य लोकांच्या जीवनात शिक्षणाचा,विचारांचा व समतेचा प्रकाश निर्माण केला.दुःखाच्या क्षणांमध्ये अपमानांचे क्षण यांचाही समावेश होतो.आपल्या सर्वांच्या हृदयात आदराचे स्थान असणाऱ्या महापुरुषांना काही अपमानाच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागले. औरंगजेबाच्या दिल्ली दरबारात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी राजे यांना पहिल्या रांगेत बसवले गेले नाही. महात्मा ज्योतिबा फुले हे पुणे शहरातील मित्राच्या लग्नाला गेले होते,परंतु धर्मांध लोकांनी वरातीत महात्मा फुले यांना सहभागी होऊ दिले नाही.सामाजिक व्यवस्थेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना वर्गात बसून शिक्षण घेऊ दिले नाही.शिक्षणानंतर बडोदा संस्थानात नोकरी करताना बाबासाहेबांना सहकारी नोकरदार व्यक्तींकडून जातीवरून अपशब्द वापरले गेले.वाटेगाव ते मुंबई असा पायी प्रवास करणाऱ्या अण्णा भाऊ साठे व त्यांच्या आईवडिलांना अनेक अपमानास्पद प्रसंगांना तोंड द्यावे लागले. अपमानाचे दुःख पचवून आपल्या कार्याने व मानवतावादी विचारांनी साऱ्या जगाला उजळून टाकणाऱ्या या महामानवांचा आपण आदर्श घेऊन आपले जीवन चांगल्या प्रकारे जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

दुःखाचे क्षण आणि अपमानाचे प्रसंग पचवता आले पाहिजेत.जे कोणी दुःख आणि अपमान पचवतात ते तावूनसुलाखून निघतात. आणि कोणत्याही प्रसंगात ते जराही डगमगत नाहीत. दुःखाने हताश होत नाहीत आणि सुखाने हुरळून जात नाहीत.जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर आणि थॉमस अल्वा एडिसन या दोघांना मतिमंद व गतिमंद समजून त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी अपमानित केले होते.या दोघांनाही घरचा रस्ता दाखवला गेला होता.या दोघांनीही मानवी जीवनात प्रकाश निर्माण करणारे वैज्ञानिक शोध लावले.कार्व्हरने हरित क्रांती घडवून आणली आणि एडिसनने विजेच्या बल्बचा शोध लावला. मराठीतील सुप्रसिद्ध साहित्यिक आणि आत्मचरित्रकार शंकरराव खरात,उत्तम कांबळे,दया पवार, लक्ष्मण माने,लक्ष्मण गायकवाड, डॉ.किशोर शांताबाई काळे, प्र.ई.सोनकांबळे,शरणकुमार लिंबाळे यांना त्यांच्या सामाजिक जीवनात अनेक वेळा अपमान व दुःख सहन करावे लागले होते.

पुढे चालून यांनी सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे,आपले स्वतःचे असे आदराचे स्थान निर्माण केले आहे.या सगळ्यांचे आत्मचरित्र वाचनीय तर आहेच परंतु प्रस्थापितांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आहे.यांच्या प्रत्येकाचे आत्मचरित्र अनमोल असा वैचारिक ठेवा आहे. हा त्यांच्या साठी एक सुखद अनुभव व आनंदाचा गोडवा ठरला आहे.

आपल्या समाजात आपलेच लोक,आपलेच समाजबांधव आणि आपले काही नातेवाईक आपल्या वाट्याला जाणूनबुजून दुःखाचे क्षण आणतात.जातीचे ठेकेदार आणि वाईट प्रवृत्तीचे लोक आपला अपमान करण्याची एकही संधी ते सोडत नाहीत.तरीही आपण डगमगायचे नसते. दुःख व अपमान पचवून पुढे पुढे चालायचे असते. आणि आनंदाचे क्षण वाट्याला आले की ते मनसोक्त जगून घ्यायचे.

तात्पर्य,जे लोक आपल्या वाट्याला आलेले दुःखाचे क्षण व अपमानाचे प्रसंग इतरांना न सांगता गिळतात आणि पूर्णतः पचवतात ते जीवनात यशस्वी होतात,आपल्या कार्याने इतरांना अचंभित करतात. म्हणून आपले दुःख व अपमानाचे प्रसंग इतरांना सांगत बसू नका.आणि नंतर जीवनात आपल्या वाट्याला चालून आलेले सुखाचे क्षण अगदी मजेत घालवा व आनंदाने जगा.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर.**
**जि.लातूर.मो.९७३०९३९७३२.**

## भाजपा तालुका उपाध्यक्षपदी बळी पाटील ढगे यांची वर्णी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२९, मुदखेड (नांदेड) :** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण,भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजया चव्हाण तसेच नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष अँड किशोरभाऊ देशमुख यांच्या सूचनेनुसार नूतन तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख यांच्या अधिपत्याखाली समितीच्या इतर तालुका पदाधिकाऱ्यांची नुकतीच कार्यकारणी जाहीर झाली. विशेष म्हणजे त्यात महाटी ग्रामपंचायत सरपंच प्रतिनिधी बळी पाटील ढगे यांची भाजपा तालुका उपाध्यक्षपदी झालेली निवड म्हणजे समस्त गावकाऱ्यांसाठी एक अनमोल उपहार ठरला.त्यांनी अगदी कमी वयात सुरु केलेल्या यशस्वी राजकारणाचं ते पारितोषिक आहे. असा संबंध गावालाच भास होत आहे.

त्यांनी मागील दशका पूर्वी राजकारणात प्रवेश केला. तेंव्हा पासून गावच्या विकासा बाबद कधी



मागे वळून पहिले नाही. सुरुवातीला अडीच वर्षाच्या सरपंचकीने त्यांच्या राजकारणाची सुरुवात झाली. त्यांचा विकासाचा दृष्टीकोन पाहता गावाने ग्रामपंचायत त्यांच्या स्वाधीन केली. गावाला यापूर्वी ग्रामपंचायतची इमारत नव्हती ती ढगे यांनी उभी केली. येणाऱ्या शिक्षित पिढी समोर बहुजन समाजाला घेऊन चालणाऱ्या चारित्र्यवान राज्याचा आदर्श पुढं ठेवण्यासाठी त्यांनी गावाच्या सहकार्याने गावातल्या मूख्य रस्त्यालगत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभा केला. मागासवर्गीय वस्तीत बुद्ध विहाराची इमारतही बांधली गावातील बंदिस्त नाली झाली मारोती मंदिराच्या प्रांगणात गट्टूचे कामही यांनी केले जलजीवन योजनेअंतर्गत पाण्याची टाकी बांधण्यात आली स्मशान भूमीत जाण्यासाठी रस्ता नव्हता त्या रस्त्याचे कामही करण्यात आले आणि सार्वजनिक स्मशानभूमीची शेड उभारण्यात आली महाटी ते दरेगाव रस्त्यांचे डांबरीकरण दीड कोटी रुपयांचे काम करण्यात आले. गावातील सर्व समाजाला घेऊन चालण्याची त्यांची वृती असल्यामुळं सरपंच म्हणून गावानं परत त्यांचाच विचार केला तर गावाच्या विकासासाठी तो दिवस सोन्याहून पिवळा असेल एवढं नक्की.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

३ बुलडाणा, बुधवार, दि.३० जुलै २०२५ संमिश्र

# थोडक्यात

## आळंदी देवाची नगरपरिषदेचा स्तुत्य उपक्रम



**अक्षराज : प्राजक्ता चव्हाण गोरे**

**दि.२८, आळंदी दे. (पुणे) :** आळंदी नगरपरिषद प्रशासनामार्फत सलग ८ दिवसांपासून विविध माध्यमांतून सूचना, ताकीद व उघड्यावर कचरा टाकल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल अशा आशयाची जनजागृती करण्यात येत होती. तरी देखील दिनांक २८ जुलै २०२५ रोजी श्रीनिवास काळे या नागरिकाने सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा टाकल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांच्यावर स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत केलेल्या शासन निर्णय नियमांनुसार ५०० (पाचशे रुपये) दंड आकारण्यात आला आहे.

आळंदी नगरपरिषदेच्या वतीने सर्व नागरिकांना नम्र आवाहन करण्यात येते की, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखावी, कचरा निर्धारित ठिकाणीच टाकावा व नगरपरिषदेच्या स्वच्छता मोहिमेस सहकार्य करावे. अन्यथा अशा प्रकारची दंडात्मक कारवाई या पुढे ही सातत्याने केली जाईल. आपल्या भागात घंटा गाडी वेळेवर न आल्यास खालील अधिकाऱ्यांशी तात्काळ संपर्क करावा ही विनंती. संपर्क - सुपरवायझर रोहन जगदाळे ८००७८४५४००, सिटी कोऑर्डिनेटर शशांक कदम ९२८४४५४५३०

## स्मार्ट मीटरबाबत वीर योद्धा प्रतिष्ठानचे महावितरणला निवेदन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२९, खंडाळा (सातारा) :** महावितरण मार्फत सध्या सर्वत्र नविन स्मार्ट मिटर बसवणे सुरु आहे याबाबत महाविरतण उपकार्यकारी अभियंता लोणंद रेड्डी साहेब यांना वीर योद्धा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब ढावरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दिनांक २९ जुलै २०२५ रोजी निवेदन देण्यात आले. आता सध्या लोणंद डिव्हिजन विभागामध्ये लोकांना कुठलीही पूर्व सूचना न देता तसेच स्मार्ट मीटर बाबत जनजागृती किंवा त्याचे फायदे तोटे न सांगता स्मार्ट मीटर बसवण्याचा सपाटा महावितरणने चालू केला आहे.

या संदर्भात वीर योद्धा प्रतिष्ठान च्या माध्यमातून महावितरणला या निवेदनाद्वारे सांगण्यात आले की, जोपर्यंत लोकांच्या पर्यंत स्मार्ट मीटरचे फायदे तोटे कळत नाहीत किंवा त्याची जनजागृती होत नाही. तसेच महावितरणने जुना मीटर तसेच स्मार्ट मीटर बाबत गावोगावी वाड्या वस्त्यावर डेमो द्यावा. तसेच आता सध्या महावितरण ने जो ग्राहक दोन महिन्याच्या पुढे घरगुती वीज बिल भरणार नाही. त्याच्या डिपॉझिटमधून ते विज बिल कपात केले जाईल. याची सुद्धा जनजागृती केली नाही. त्याबाबत महावितरणचे उपकार्यकारी अभियंता रेड्डी यांना विचारणा केली असता त्यांनी स्पष्ट सांगितले की ती सिस्टीम आम्ही आत्ता सध्या तरी बंद केलेली आहे. कारण याचा ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच जोपर्यंत स्मार्ट मीटरची जनजागृती लोकांपर्यंत पोहोचत नाही. तसेच त्याचे फायदे तोटे कळत नाहीत. तोपर्यंत वीर योद्धा प्रतिष्ठानचा या स्मार्ट मीटरला कायम विरोध राहील. अशा आशयाचे निवेदन महावितरणला देण्यात आले. याप्रसंगी वीर योद्धा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य कोर कमिटी अध्यक्ष अमोल शेठ बनसोडे, सातारा जिल्हा कार्याध्यक्ष पवन धायगुडे, खंडाळा तालुका उपाध्यक्ष स्वप्निल जावळे, खंडाळा तालुका संघटक राहुल वेळे, खंडाळा तालुका क्रियाशील सदस्या अनिता शेलार, युवा नेते प्रथमेश दगडे पाटिल तसेच इतर उपस्थित होते.


## भाजपच्या सत्तेमध्येच भाजपचे आंदोलन; नागरिक त्रस्त, विद्यार्थी, जेष्ठ नागरिकांचे हाल

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.२९, कल्याण :** केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महापालिकेत भाजपची सत्ता असताना ही भाजपकडूनच पाणी टंचाईविरोधात आंदोलन छेडल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि संताप दोन्ही निर्माण झाले आहेत. चक्कीनाका, विठ्ठलवाडी आणि आजूबाजू परिसरातील शाळांमध्ये जाणारे विद्यार्थी, रुग्णवाहिकेतून जाणारे रुग्ण आणि जेष्ठ नागरिक यांना या आंदोलनामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मंगळवार, दिनांक २९ जुलै २०२५ रोजी सकाळपासून कल्याण पूर्वेतील काही महत्त्वाच्या रस्त्यांवर भाजप कार्यकर्त्यांनी रास्ता रोको आंदोलन छेडले. यामुळे वाहतूक ठप्प झाली असून अनेक नागरिक वेळेवर कार्यालयात पोहोचू शकले नाहीत. विद्यार्थ्यांना शाळांमध्ये पोहोचताना उशीर झाला, तर काही रुग्णवाहिकांना रस्ता न मिळाल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली. सत्तेवर असलेल्या भाजपनेच आंदोलन का करावे लागते, हा प्रश्न नागरिक विचारत आहेत. तुमच्याच पक्षाची सत्ता असताना तुम्हीच आंदोलन करता म्हणजे नागरिकांना वेठीस धरण्याचा हा प्रकार नाही का? असा सवाल संतप्त स्थानिकांनी उपस्थित केला आहे. भाजप स्थानिक नेतृत्वाच्या मते, पाणीटंचाईचा प्रश्न महापालिकेने वेळेत सोडवला नाही, म्हणून आंदोलनाची गरज भासली. मात्र, नागरिकांच्या मते ही जबाबदारी झटकण्याची आणि सामान्य जनतेच्या अडचणींना अधिक गंभीर बनवण्याची भूमिका आहे.

## खापरखेड्यात नागपंचमी विविध धार्मिक कार्यक्रमांतर्गत साजरी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** खापरखेडा येथील मुख्य बाजारपेठेत असलेल्या नागमंदिर परिसरात नागपंचमीचे औचित्य साधून २९ जुलै मंगळवारला नागद्वार पंच कमिटीच्या वतीने चार दिवसीय विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. चार दिवसीय कार्यक्रमा दरम्यान भजन, कीर्तन महादेवाची गाणी, जस आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात महिला व पुरुष भजनी मंडळाने भाग घेतला. नागपंचमीच्या पावन पर्वावर सकाळ पासूनच नाग मंदिरात भाविकांनी गर्दी केली होती. शेकडो भक्तांनी दुधाचा अभिषेक केला शिवाय आरती व इतर धार्मिक कार्यक्रम पार पडले. याप्रसंगी नागमंदिर ते बिनासंगम कावड यात्रा काढण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागद्वार पंच कमेटीचे संस्थापक अध्यक्ष अरुण बोरीकर, नरु पौनीकर, सुरेश गुडधे, शावण बोरीकर, राजू ढोले, असलम शेख, मनोज सारंगे, शीकांत उमाळे, दुर्गा यादव, राजू उंभरकर, चतुर्वेदी महाराज, दिलीप सारंगे, रोहित बोरीकर आदींनी सहकार्य केले.

# समाजसेविका अश्विनी केंद्रे यांचे बेमुदत धरणे आंदोलन स्थगित

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.२९, दिवा (ठाणे) :** दिवा जंक्शन ते सी.एस.एम.टी. लोकल सेवा सुरू करण्यासाठी कित्तेक वर्षापासून निवेदन, हजारो प्रवाशांनी स्वाक्षरी मोहीम घेऊन निवेदन, मोर्चा, ढोल बजाव आंदोलन करून ७ दिवस आमरण उपोषण केले. त्यावेळीही पुढच्या वर्षी पर्यंत लोकल चालू होईल असे सांगण्यात आले होते. लोकल चालू केली नाही. परंतु दिवा येथे १९ फास्ट लोकल थांबवण्यात आल्या होत्या. अमोल धनराज केंद्रे आणि अश्विनी अमोल केंद्रे तसेच त्यांच्यापाठी खंबीर पने साथ देणारे सामाजिक संघटना राजकीय पक्ष, प्रवाशी माता भगिनी यांच्या मुळे शक्य झाले होते. परंतु दिवा ते सी.एस.एम.टी. लोकल चालू करण्याचा लढा पूर्ण झाला नसल्याने समाजसेविका अश्विनी केंद्रे यांनी १ जुलै पासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. विशेष म्हणजे २७ जुलै रोजी आंदोलनाच्या २७ व्या दिवशी त्यांचा वाढदिवस असूनही त्यांनी तो जनहिताच्या लढ्याला वाहून दिला होता.

१ जुलै पासून लढा सुरू झाला पण रेल्वे प्रशासन दखल घेत नसल्याने अमोल केंद्रे यांच्या नेतृत्वात २० जुलै रोजी एल्गार मोर्चा काढून दोन दिवसात दखल न घेतल्यास रेल रोको करण्याचे जाहीर करताच. २२ जुलै आणि २३ जुलै रोजी रेल्वे प्रशासनाचे अधिकारी यांनी भेट घेतली. त्यावेळी पावसामुळे मंडप पडला होता. मंडपाची सहनशीलता संपली पण माझी नाही जनतेचे जीव वाचवण्यासाठी मी लढत आहे. असे रेल्वे अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. रेल्वे अधिकारी आणि पोलिस प्रशासनाच्या मध्यस्थीने २४ जुलै रोजी रेल्वे मुख्यालयात झालेल्या बैठकीत पार पडली. त्यात

१) सकाळच्या वेळेत ०६:३० ते ११:३० या वेळेत दिवा जंक्शन येथे लोकल वाढवण्यास होकार दिला.

२) दिवा हे ३ एप्रिल १८६७ चे जंक्शन असूनही सर्व जलद गाड्यांना थांबा नाही.किमान कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ वरून येणाऱ्या फास्ट लोकल थांबवणे बाबत होकार दिला. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास सुकर होणार आहे.

३) दिवा ते पनवेल दरम्यानही मोठी लोकसंख्या राहते व प्रवास करते.या मार्गावर लोकल सेवा सुरू केल्यास नवी मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील अनेक प्रवाशांचे दैनंदिन जीवन सुलभ होईल. यासाठी त्यांनी सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिले.

४) ९ जून रोजी मुंब्रा येथे घडलेल्या अपघातात रेल्वेची ॲम्ब्युलन्स नसल्याने अपघात ग्रस्त प्रवाश्यांना टेम्पोमध्ये टाकून नेहण्यात आले. ही दुर्दैवी घटना मध्य रेल्वे प्रबंधक यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर दिवा आणि मुंब्रा तसेच इतर प्रत्येक रेल्वे स्टेशन वर २४ तास ॲम्ब्युलन्स सेवा देण्याचे मान्य केले आहे. आणि दिवा जंक्शन साठी ज्या होतील त्या सोईसुविधा देण्याचे मान्य केले होते.

५) दिवा येथून दररोज हजारो प्रवासी कोपर, डोंबिवली, ठाकुर्ली, वरून वापस सी.एस.एम.टी.कडे प्रवास करतात. सध्या त्यांना दुसऱ्या स्थानकांवर जाऊन लोकल बदलावी लागते. दिवा सी.एस.एम.टी. लोकल चालू झाली तर दिवा, कोपर, डोंबिवली, ठाकुर्ली येथील प्रवाश्यांना न्याय मिळेल. परंतु याबाबत स्पष्ट भूमिका घेण्यास जनतेच्या समोर मांडण्यास रेल्वे प्रशासनाने नकार दिला. जनतेच्या समोर लोकल बाबत स्पष्ट भूमिका मांडली नाही तर जनतेचा उद्रेक होईल आणि याची जबाबदारी रेल्वे प्रशासनाची असेल. कारण निवडणूक आली की राजकीय पक्ष नेते दिवा सी.एस.एम.टी. लोकल चालू करण्याचे आश्वासन देतात. पण प्रत्यक्षात लोकल चालू होणार की नाही याबाबत रेल्वे प्रशासन गप्प का? त्यामुळे जनते समोर भूमिका स्पष्ट करावीच लागेल. असे मत शिष्टमंडळाने मांडून निवेदन दिले होते.

निवेदनावर दुसऱ्या दिवशी चर्चा करून भूमिका स्पष्ट करू असे आश्वासन देऊन ही टाळाटाळ केली. त्यामुळे केंद्रीय रेल्वे बोर्ड आणि मध्य रेल्वे यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. वरील सर्व मागण्या तसेच गेल्या ११ वर्षात दिवा ते सी.एस.एम.टी. लोकल सेवा का सुरू करण्यात आली नाही. दिवा ते सी.एस.एम.टी. लोकल कधी चालू होणार. तसेच

२०१४ पासून आत्ता पर्यंत किती प्रवासी माता भगिनी वडीलधारे प्रवासी बांधवाचे विद्यार्थ्यांचे जीव गेले.त्यांना रेल्वेने मदत का केली नाही. दिवा ते सी.एस.एम.टी. स्पेशल लोकल, सर्व फास्ट लोकल थांबवणे याबाबत स्पष्ट भूमिका उच्च न्यायालयात रेल्वे प्रशासनास मांडावी लागणार आहे. यासाठी समाजसेवक अमोल धनराज केंद्रे यांनी मिनिस्ट्री ऑफ रेल्वे नवी दिल्ली, चीफ सेक्रेटरी ऑफ रेल्वे बोर्ड, मध्य रेल्वे प्रबंधन DRM, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन, महाराष्ट्र सरकार यांच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून ॲडव्होकेट प्रभात दुबे आणि त्यांची पूर्ण टीम दिवा ते सी.एस.एम.टी. लोकल चालू करण्यासाठी तसेच इतर मागण्या बाबत लढा देणार आहे. ही लढाई कोणत्याही राजकीय हेतूपोटी नाही. ही सामान्य जनतेची माता, भगिनी वडीलधारे प्रवासी बांधवाचे विद्यार्थ्यांचे जीव वाचवण्यासाठी रोजच्या जगण्याशी संबंधित न्यायालयात असताना देखील आमदार, खासदार, माजी लोकप्रतिनिधी यांनी आंदोलनास पाठ फिरवणे ही दुर्दैवी बाब आहे. एक मराठी सामान्य महिला पाऊस वारा असतानाही स्वतः ची, स्वतः च्या परिवाराची पर्वा न करता लढत आहे.

१ जुलै पासून अश्विनी केंद्रे यांचे सुरू असलेले बेमुदत धरणे आंदोलनाला मंगळवार, दिनांक २९ जुलै २०२५ रोजी २९ व्या दिवशी स्थगित करून यापुढे न्यायालयीन लढा लढून मागण्यांची पूर्तता करून दिवा ते सी.एस.एम.टी. लोकल दिवा शहरातील जनतेसाठी सुरू करणार असल्याचे समाजसेविका अश्विनी केंद्रे व अमोल धनराज केंद्रे यांनी सांगितले. आता रडायचे नाही तर लढायचे आता आपल्या दिवा वासियांचे जीव वाचवण्यासाठी दिवा ते सी.एस.एम.टी. लोकल चालू करायची आहे. त्यामुळे जनतेने साथ आणि आशीर्वाद पाठीशी खंबीर पने ठेवण्याची विनंती केली आहे.

## दिव्यात ३०० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बॅग वाटप

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.२८, दिवा (ठाणे) :** इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन केलेल्या ३०० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना विक्रोळी विधानसभा विभागाचे अध्यक्ष ॲड.प्रथमेश कृष्णा धुरी आणि प्रेरणा शिक्षण सहाय्यक संस्था संस्थापक उमेश मोरे यांच्या संयुक्त उपक्रमातून नवमहाराष्ट्र व्यायाम शाळा येथे हा सत्कार समारंभ पार पडला. या कार्यक्रमात कै.आशा विमल मेहेरा यांच्या स्मरणार्थ व क्वालिटी फ्रुटचे नागेश सिद्धाप्पा नवलगुंड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व शालेय बॅग प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. याशिवाय वह्या, पेन आदी शालेय साहित्याचे वाटपही करण्यात आले. या उपक्रमाला धन्वंत शहा (डीएम पाकीट वाला - दादर), सुपर टोन इलेक्ट्रिशन प्रा.लि.चे मॅनेजर भावेश शहा व दिलीप प्रशाद यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाला मनसेचे उपाध्यक्ष विनोद शिंदे, महिला विभाग अध्यक्षा व नगरसेविका प्रियांका शृंगारे, प्रेरणा संस्थेचे सेक्रेटरी अरविंद बोलाईकर, शाखा अध्यक्ष गॉडफ्री डिसोझा, महिला शाखा अध्यक्षा मानसी मिठबावकर, विद्यार्थी सेना उपविभाग अध्यक्षा सुप्रिया केळुसकर, उपविभाग सचिव अल्पेश मेकडे तसेच अनेक उपशाखा अध्यक्ष, गटअध्यक्ष व महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी व त्यांच्या यशाचा गौरव करण्याचा स्तुत्य उपक्रम म्हणून या सत्कार सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वाई वन विभागाने रानटी प्राण्यांचा बंदोबस्त करावा - मयूर नळ

**अक्षराज : दिलीप कांबळे**



**दि.२९, वाई (सातारा) :** वाई तालुक्याच्या पश्चिम भागातील वासोळे, तुपेवाडी, काळेवाडी, कोंढावळे,भिवडी गोवे अशा अनेक गावांमध्ये बिबट्याचा वावर वाढला आहे. बिबट्या कुत्रे व शेळ्यांचा फडशा पाडत आहे. तसेच रानडुक्कर कोल्हे तरस भोर माकडा मुळे शेती पिकांची नासाडी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले म्हणूनच वाई वनविभागाने रानटी प्राण्यांचा बंदोबस्त करावा. अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेना वाई विधानसभा अध्यक्ष मयूर नळ यांनी दिले आहे. हे निवेदनात म्हटले आहे की, बिबट्याचा धुमाकूळ वरांटी प्राण्यांच्या उपद्रवामुळे या भागातील शेतकरी भयभीत झाला आहे.

गेले २ महिने या भागातील नागरिकांनी वन विभागाकडे सतत तक्रारी करूनही कुठलाच ठोस उपाय अथवा प्राण्यांना पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आलेला नाही. जर भविष्यात मनुष्य जीवितहानी झाल्यास खात्याला जबाबदार धरून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा लागेल. रानटी प्राण्यामुळे पिके उद्दिष्ट झाली. त्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत. वनविभागाने पिंजरे लावून गस्त वाढवावी आणि बिबट्याला पकडण्यासाठी ठोस उपाययोजना करावी. अन्यथा मनसेच्या वतीने वनविभागाला जागा आणण्यासाठी कार्यालयामध्ये ठिया आंदोलन करण्यात येईल. असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर मनसे वाई तालुका अध्यक्ष मयूर नळ, सार्थक कोंढाळकर, दीपक भंडगे, हर्षद हरचंदे, वैभव जाधव, आदी मनसे कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

# एचआयव्ही/ एड्स जनजागृतीसाठी भव्य 'रेड रन मॅराथॉन' संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२९, चंद्रपूर :** एचआयव्ही/ एड्स विषयक जनजागृतीसाठी मंगळवार, दिनांक २९ जुलै २०२५ रोजी जिल्ह्यात भव्य रेड रन मॅरॅथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय चंद्रपूर आणि जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा पार पडली.

जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या या स्पर्धेचे आयोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.भास्कर सोनारकर, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुमंत पानगंटीवार आणि क्रीडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड यांच्या उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवून स्पर्धेला सुरुवात झाली. युवक गटामध्ये भूषण

**चंद्रपुरातील युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग**

आस्वले यांनी प्रथम क्रमांक, साईनाथ पुंगाटी यांनी द्वितीय क्रमांक व रोशन नैताम यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तर युवती गटात श्रद्धा थोरात प्रथम, साक्षी पोलोजवार द्वितीय आणि आचल कडुकर तृतीय क्रमांकाने विजयी ठरल्या.

विजेत्यांना शिल्ड आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यापैकी निवडक स्पर्धकांना १२ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रेड रन मॅरॅथॉन मध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार असल्याचे पानगंटीवार यांनी सांगितले. स्पर्धेचे मुख्य गुणलेखक म्हणून रोशन भुजाडे, दर्शन माशीरकर, भुमेश्वर कन्नमवार यांचे योगदान लाभले. पंच म्हणून आदर्श चिवंचरणदास डे, नावेद खान, सौरभ कन्नाके व ऋतिक धोडरे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे संचालन जिल्हा पर्यवेक्षक निरंजन मंगरुळकर यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संकल्प बहुउद्देशीय ग्रामविकास संस्था, नोबल शिक्षण संस्था, पॅन इंडिया आणि क्राईस्ट हॉस्पिटल सोसायटी यांचा मोलाचा सहभाग लाभला.

# कौडगाव एमआयडीसीमध्ये लॉजिस्टिक पार्क उभारा यासाठी गडकरींना निवेदन

## राज्य सरकार मार्फत प्रस्ताव आल्यास मंजुरी देण्याचे गडकरी यांचे अश्वासन

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२९, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीस चालना देण्यासाठी कौडगाव (ता. धाराशिव) येथील एमआयडीसी क्षेत्रात लॉजिस्टिक पार्क स्थापन करण्याची महत्वाची मागणी खासदार ओम राजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. संसद भवन येथील कार्यालयात भेट घेऊन त्यांना हे निवेदन दिले.कौडगाव एम आयडीसी साठी एकूण ३८०.५० हेक्टर क्षेत्र अधिग्रहित करण्यात आले आहे. त्यातील ९० हेक्टर टेक्निकल टेक्सटाईल पार्कसाठी तर ७० हेक्टर प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. उर्वरित २२०.५० हेक्टर क्षेत्रावरधाराशिव लॉजिस्टिक पार्कविकसित करता येईल. धाराशिव हे भौगोलिक दृष्ट्या राष्ट्रीय महामार्ग



- ५२,राज्य महामार्ग ६७,धाराशिव रेल्वे स्थानकाच्या नजीक असल्याने लॉजिस्टिक पार्कसाठी अत्यंत योग्य ठिकाण आहे. प्रस्तावित सूरत-चेन्नई महामार्ग देखील या परिसरातून जाणार आहे. हा प्रकल्प राज्याच्या तसेच दक्षिण भारताच्या व्यापारवाढीला चालना देणारा ठरेल.

लॉजिस्टिक पार्कमध्ये कोल्ड स्टोरेज,ड्रोन लॉजिस्टिक,ट्रान्सपोर्ट हब,पॅकिंग यासारख्या सेवा विकसित करता येतील. या प्रकल्पामुळे सुमारे अडीच ते तीन हजार थेट रोजगार व हजारो अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण २०२४ अंतर्गत धाराशिव जिल्ह्याचा समावेश प्रोत्साहन जिल्ह्यांमध्ये करण्यात आला आहे.

तसेच जिल्हा लॉजिस्टिक नोड म्हणून मान्यता मिळाल्यामुळे या प्रकल्पास धोरणात्मक पाठबळ ही मिळू शकते.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे देखील या प्रकल्पाबाबत सकारात्मक आहेत. महाराष्ट्र सरकारकडून प्रस्ताव आल्यास त्याला मंजुरी देऊ असे आश्वासन त्यांनी दिले. हा प्रकल्प धाराशिवचा औद्योगिक चेहरा बदलण्यात महत्वाची भूमिका बजावण्याची शक्यता आहे. येत्या काळात जिल्ह्याला एक नवा आर्थिक गतीमान चेहरा मिळू शकतो.

# वडापूरकरांच्या विकासाच्या संकल्पना जिल्हाभर राबविणार - आ.देशमुख

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२९, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर येथील प्रभूलिंग यात्रा कमिटीच्या वतीने राबविलेल्या विकासाच्या संकल्पना जिल्हाभर राबविणार असल्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले. सोलापूर सोशल फाउंडेशन व लोकमंगल समूह यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर दरम्यान जिल्हा पर्यटन महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सुभाष देशमुख यांनी वडापूर गावाला भेट दिली. प्रारंभी येथील बालसंस्कार केंद्राची पाहणी केली. पालखी तळावर वृक्षारोपण, शिवलिंगाचे पूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रभूलिंग देवाचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर प्रगतशील द्राक्ष उत्पादक शेतकरी बाळासाहेब झांबरे-पाटील, मराठा सेवा संघाचे प्रशांत पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सुभाष पाटील, परमानंद देव ट्रस्टचे अध्यक्ष पंडित पुजारी, गणपती पुजारी, बिपिन पाटील, नामदेव गायकवाड, प्रमोद गुंड आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात अरुण पाटील यांनी वडापूर गावच्या विकासाबाबत, प्रभुलिंग मंदिर परिसरात राबवलेली विकास कामे, प्रस्तावित कामे याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्येक कामासाठी पैशाचीच गरज असते असे नाही तर त्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती पाहिजे. लोकसहभाग महत्त्वाचा असतो, त्याग करण्याची ही मानसिकता पाहिजे. शिवाय या गावात कोणताही निर्णय सर्वानुमते घेतला जातो. विकास कामात राजकारण केले जात नाही. या गोष्टी मला वडापूर ग्राम स्थांमध्ये पहावयास मिळाल्या. प्रभुलिंग मंदिर परिसरात विकासासाठी गावच्या लेकींना सामावून घेतले ही संकल्पना



### बाल कीर्तनकार यांचे गाव वडापूर

वडापूरच्या बालसंस्कार केंद्रामध्ये सात बाल कीर्तनकार, उत्कृष्ट गायक, तबलावादक आहेत. जर का यांचा प्रसार व प्रचार जिल्हाभर केला तर वडापूर हे बाल कीर्तनकारांचे गाव म्हणून ओळखले जाईल, असे सुभाष देशमुख यांनी सांगितले.

वेगळी वाटते. विकासासाठी आपण ज्या संकल्पना राबविल्या आहेत त्या आता जिल्हाभर राबविणार आहे. प्रभुलिंग मंदिर परिसर धार्मिक पर्यटन स्थळासाठी अतिशय उत्कृष्ट आहे. त्याचे आपण मार्केटिंग करावे, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन डॉक्टर महेश पाटील यांनी केले. कार्यक्रमानंतर आलेल्या भाविकांसाठी महाप्रसादाची सोय केली होती.

# शरीरातील प्रोटीन व कॅल्शियम कमी होऊ नये म्हणून खा हे ५ व्हेज पदार्थ !

बहुतेक भारतीयांच्या दैनंदिन आहारात प्रथिनांची तीव्र कमतरता असते, ज्यामुळे अनेक आरोग्य समस्या कायम राहतात. जर तुम्ही देखील शाकाहारी असाल आणि तुमची दैनंदिन प्रथिनांची गरज कशी पूर्ण करावी याबद्दल गोंधळलेले असाल, तर तुम्ही या छोट्या टिप्स अवलंबू शकता.

शरीराची वाढ आणि कार्यक्षम तेसाठी प्रोटीन हा अत्यावश्यक घटक आहे. स्नायू, त्वचा, केस आणि शरीरातील विविध ऊतींच्या दुरुस्तीसाठी तसेच हार्मोन्स आणि एन्झाइम्सच्या निर्मितीसाठी प्रोटीन महत्त्वाची भूमिका बजावतो. तरीही आपल्या रोजच्या आहारात प्रोटीनची कमतरता असते, विशेषतः जे लोक शाकाहारी आहेत त्यांच्यासाठी ही कमतरता अधिक जाणवते.

अंडे किंवा मांसाहार करणाऱ्यांना प्रोटीन सहज मिळते, पण शाकाहारी आहारात हे थोडं आव्हानात्मक ठरतं. प्रोटीनची कमतरता राहिल्यास थकवा, स्नायूंची कमजोरी, केसगळती, त्वचेची समस्या अशा अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे आहारात काही सोप्या बदलांमधून प्रोटीनची आवश्यकता पूर्ण करता येते.

आहारात नियमित डाळी आणि कडधान्यांचा समावेशमसूर, मूग, चणे, राजमा आणि चवळी यांसारख्या डाळी आणि कडधान्ये शाकाहारींसाठी प्रोटीनचे उत्तम आणि किफायतशीर स्रोत आहेत. रोजच्या प्रत्येक जेवणात यांचा काही ना काही प्रकारे सम ावेश असावा. डाळ-भात, डाळ-रोटी किंवा सूप या स्वरूपात यांचा वापर करता येतो.



मोड आलेल्या डाळीतर अधिक पचायला सोप्या आणि पोषक असतात. नियमित सेवन केल्याने शरीराला सर्व आवश्यक अमिनो ॲसिड मिळतात आणि उर्जा तसेच ताकद वाढते. दूध व दुग्धजन्य पदार्थांचे फायदेदूध, दही, पनीर आणि ताकयांसारखे पदार्थ प्रोटीनने समृद्ध असतात. सकाळी दूध, दुपारच्या जेवणासोबत दही आणि अधूनमधून पनीरच्या भाज्या किंवा स्नॅक्स यांचा समावेश आहारात केल्यास प्रोटीनची कमतरता भरून निघते. वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असल्यास लो-फॅट दूध किंवा दही वापरणे फायदेशीर ठरते. तसेच स्मूदी, शेक किंवा लस्सीच्या स्वरूपात हे पदार्थ आहारात घेतले जाऊ शकतात.

सोया प्रोडक्ट्स उत्तम पर्यायटोफू, सोया चंक्स आणि सोया मिल्क हे प्लांट-बेस्ड प्रोटीनचे उत्कृष्ट स्रोत आहेत. जे लोकांना दूध-दही चालत नाही त्यांच्यासाठी हा उत्तम पर्याय ठरतो. सोया चंक्सची भाजी, पुलाव किंवा सूपमध्ये त्याचा वापर करता येतो. आठवड्यातून दोन-तीन वेळा यांचा आहारात समावेश केल्याने शरीराला आवश्यक प्रोटीन मिळते. टोफू पराठा, सँडविच किंवा सॅलडमध्ये वापरल्यास स्वाद आणि पोषण दोन्ही वाढतात.

टोफू, सोया चंक्स आणि सोया मिल्क हे प्लांट-बेस्ड प्रोटीनचे उत्कृष्ट स्रोत आहेत. जे लोकांना दूध-दही चालत नाही त्यांच्यासाठी हा उत्तम पर्याय ठरतो. सोया चंक्सची भाजी, पुलाव किंवा सूपमध्ये त्याचा वापर करता येतो.

आठवड्यातून दोन-तीन वेळा यांचा आहारात समावेश केल्याने शरीराला आवश्यक प्रोटीन मिळते. टोफू पराठा, सँडविच किंवा सॅलडमध्ये वापरल्यास स्वाद आणि पोषण दोन्ही वाढतात.सुकामेवा आणि बियांचा समावेशबदाम, अक्रोड, शेंगदाणे, चिया बिया,भोपळ्याच्या बिया आणि अळशीच्या बिया हे सर्व प्रोटीनने भरपूर असतात. हे पदार्थ स्नॅक्स म्हणून खाता येतात किंवा स्मूदी, पुडिंगमध्ये मिसळूनही सेवन करता येतात. यामुळे प्रोटीनसोबतच हेल्दी फॅट्स, फायबर आणि इतर पोषक घटकही मिळतात.

संपूर्ण धान्यांचे फायदेब्राऊन राईस, ज्वारी, बाजरी, ओट्स आणि संपूर्ण गहू यांसारखी धान्ये जास्त प्रक्रिया न केलेली असल्याने त्यात पोषक घटक मुबलक प्रमाणात टिकून राहतात. डाळींसोबत ही धान्ये खाल्ल्यास शरीराला पूर्ण प्रोटीन मिळते आणि सर्व आवश्यक अमिनो ॲसिडची पूर्तता होते. आहारात अशा छोट्या बदलांमुळे प्रोटीनची गरज सहज पूर्ण होऊन शरीर निरोगी आणि ऊर्जावान राहू शकते.

# आदिवासी विकास विभागांतर्गत पूर्ण कामांचा प्रलंबित दायित्व निधी तातडीने वितरित करावा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, मुंबई :** आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांचा प्रलंबित दायित्व निधी तातडीने वितरित करावा, तसेच त्याबाबतच्या मागणीचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागाने वित्त विभागाकडे सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले.

आदिवासी विकास विभागाच्या विविध प्रलंबित विषयांबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार भीमराव केराम, नितीन पवार, आमश्या पाडवी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, अर्थसंकल्पात एकूण रकमेच्या प्रमाणात अनुसूचित जाती, जमातींना निधीचे वितरण निकषाप्रमाणे करण्यात येते. आदिवासी विकास विभागांतर्गत वसतिगृहांची कामे दर्जेदार झाली पाहिजे, त्याप्रमाणे त्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

यावेळी भौतिकदृष्ट्या पूर्ण व प्रगतीपथावरील रस्ते व पुलांची कामे, लेखाशीर्ष ३०५४ अंतर्गत कामे, ठक्कर बाप्पा योजना, शासकीय आदिवासी विभागातील इमारतींची बांधकामे, अधिसंख्य झालेल्या जागेवर विशेष भरती, राज्यभरातील आदिवासी आश्रम शाळेमध्ये रोजंदारीवर, तासिकेवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

# थोडक्यात

## महाजेनकोच्या तंत्रज्ञ ३ च्या भेदभावात्मक भरतीवर उच्च न्यायालयात प्रश्नचिन्ह

**अक्षराज : दिवाकर**

**घेरदि.२८, नागपूर :** महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित (महाजेनको) यांच्या टेक्निशियन ग्रेड-३ पदासाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेतील भेदभावात्म क अटींविरोधात दाखल याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण दखल घेतली. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने महाजेनकोला नोटीस बजावत दोन आठवड्यांत सविस्तर उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. ही याचिका सौरभ मादासवार आणि जगन्नाथ पिदूरकर या उमेदवारांनी दाखल केली असून, यामध्ये ३ प्रमुख आक्षेप घेण्यात आले आहेत :- (१) केवळ कोराडी गावातील उमेदवारांना २५ अतिरिक्त गुण देणे, (२) प्रकल्पग्रस्तांसाठी ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण, आणि (३) उडठ प्रशिक्षण घेतलेल्या सामान्य प्रवर्गातील उमेदवारांना २५ पर्यंत बोनस गुण देणे. याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. दीपक चटप यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, या अटी संविधानातील अनुच्छेद १४ व १६ चे उल्लंघन करतात आणि त्या सेवा नियमावलीत सामील नसल्याने कायदेशीर अधिकारविहीन आहेत. उच्च न्यायालयाने दखल घेत महाजेनकोला उत्तर सादर करण्याचे आदेश दिल्याने महाराष्ट्रातील इतर प्रकल्पग्रस्त व सामान्य उमेदवारांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली असल्याचे मत याचिकाकर्ते सौरभ मादासवार यांनी व्यक्त केले. महाजेनकोकडून उत्तर सादर केल्यानंतर खटल्याची पुढील सुनावणी निश्चित होणार आहे.

## शब्दा...शब्दांवर होणार जुगलबंदी; शाहीर फटकरे, धुमक प्रथमच आमनेसामने



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२९,मुंबई :** कोकणातील गरीब गरजू रुग्णांसाठी अल्पदरात रूग्णवाहिका उपलब्ध होण्यासाठी स्व.तानाजी डाफळे प्रतिष्ठान आणि विरार-नालासोपारा-वसई रहिवाशी संघ (गुहागर विधानसभा) संस्थापक/अध्यक्ष मनोज डाफळे यांच्या संकल्पनेतून निधी संकलनासाठी रविवार दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वा.प.भाऊसाहेब वर्तक हॉल,सांस्कृतिक भवन,विरार-पश्चिम येथे कोकणातील बहुप्रिय लोककला कलगी तुरा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कलगी तुरा पटलावर गुहागर तालुक्यातील प्रतीक्षेत असणारे पहाडी आवाजाचे शाहीर कलगीवाले शाहीर विनोद फटकरे (मढाळ-गुहागर) आणि तुरेवाले शाहीर सुशीलकुमार धुमक (निवोशी-गुहागर) ह्या शाहिरांत ही लक्षवेधी जुगलबंदी रंगणार आहे. कलगी तुऱ्याच्या पटलावर हे दोन्ही शाहीर प्रथमच आमने सामने येत असल्याने श्रावण मेघगर्जनेसह विरार नगरीत मनोरंजनाचा धुवांधार रसिकांना पाहायला मिळणार आहे. प्रत्येक शब्दा शब्दांवर होणारी ही जुगलबंदी नाविन्यतेची आगळीक पर्वणी असणार आहे. सदर उपक्रमाला गुहागर सुपुत्र तसेच शिवसेना वरळी माजी नगरसेवक दत्ता नरवणकर, समाजसेवक संतोष जैतापकर, समाजसेवक जयराम पवार, संतोष दादा जैतापकर वैद्यकीय मदत कक्ष,गुहागर प्रतिष्ठान विरार,यांचे विशेष सहकार्य लाभले असून वैद्यकीय क्षेत्रातील ह्या महत्वपूर्ण उपक्रमाच्या संकलननिधी प्रति आयोजित कलगी तुरा कार्यक्रमाला कलाप्रेमी रसिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून मनोरंजनाचा आस्वाद घ्यावा, अधिक माहितीसाठी ९८८११९५८४३/९१४५१३२३०० या भ्रमणध्वनी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## माती - पाणी परीक्षण कार्यक्रम संपन्न शेतकऱ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२९, खंडाळा (सातारा) :** फलटण येथील श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत पाडळी गावात माती व पाणी परीक्षण कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे उद्यान दूत प्रथमेश चौधरी, हर्षल काळे, जतिन मांढरे, प्रज्वल मुचंडी, कल्लपा मुचंडी आणि पंचरत्न वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना माती व पाणी परीक्षणाचे महत्त्व समजावून सांगणे हा होता. मातीतील पोषणद्रव्यांचे प्रमाण, त्यातील कमतरता व जमिनीच्या पोत सुधारण्याचे उपाय याबाबत माहिती देण्यात आली. योग्य पद्धतीने माती व पाण्याचे परीक्षण करून पिकांचे उत्पादन वाढवता येते, यावर भर देण्यात आला. कार्यक्रमात डॉ.प्राजक्ता मेटकरी (माती व पाणी परीक्षण तज्ज्ञ) यांनी माती परीक्षण म्हणजे काय?, त्याचे फायदे काय आहेत? तसेच जमिनीची पोत सुधारण्यासाठी घ्यावयाची उपाययोजना यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत शंकांचे निरसन ही केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये सुरेखा वाघमारे (सरपंच), हरीभाऊ माने (माजी सरपंच), पूजा निगडे (ग्रामसेविका), सखाराम शेडगे, बापुराव धायगुडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.निंबाळकर, डॉ.यु.डी.चव्हाण, कार्यक्रम अधिकारी डॉ. जे.व्ही.लेंभे, डॉ.ए.के.अभंगराव तसेच समन्वयक प्रा.ए.डी. पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी शेतकऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यात अशा प्रकारचे प्रशिक्षण व माहितीपर कार्यक्रम नियमितपणे व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळाद्वारे संचालित लोकमान्य टिळक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, लोकमान्य टिळक कन्या विद्यालय, लोकमान्य टिळक ज्ञान मंदिर आणि स्व. चंद्रभागाबाई मद्दीवार उच्च प्राथमिक विद्यालय, अहेरी या चार विद्यालयातर्फे आयोजित लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी चा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक ०१ ऑगस्ट सकाळी ८:३० वाजता स्थानिक प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमात १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त करणाऱ्या तसेच क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक लोकसत्ताचे वृत्त संपादक रवींद्र जुनारकर यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चंद्रपूरचे ज्येष्ठ विधीज्ञ तथा लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.रवींद्र भागवत, उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार, सचिव गांगेय सराफ तसेच स्मारक मंडळाचे सर्व पदाधिकारी यांची उपस्थिती राहील. कार्यक्रमाला माजी विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.